वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शनिवार दि. २८ जून २०२५ पाने ४ किंमत ३

## वक्फ बिलाविरूध्द मुस्लीम समाज उद्या एकवटणार

# बीडमध्ये उद्या निषेध सभा

Protest Against waqf act




#REJECTWAQFACT

ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाचे अध्यक्ष सैफुल्लाह सहाब, सचिव हजरत उमरैन सहाब यांची उपस्थिती

बीड, (दिव्य न्युज):- केंद्र सरकारच्या वक्फ विरोधी दुरूस्ती विधेयकाविरूध्द जिल्हाभरातील मुस्लीम समाज पुन्हा एकदा एकवटणार आहे. उद्या रविवार दि.२९ जुन रोजी दुपारी १ ते ५ यावेळेत मोमीनपुरा बायपास रोडवरील मैदानात वक्फ बिलाविरूध्द जननिषेध सभा आयोजीत करण्यात आली आहे. या जननिषेध सभेला संबोधित करण्यासाठी ऑल इंडिया पर्सनल लॉ बोर्डाचे अध्यक्ष फकीह असर हजरत मौलाना खालीद सैफुल्लाह साहाब रहमानी, बोर्डाचे सचिव हजरत मौलाना उमरेन साहाब रहमानी, जनरल सेक्रेटरी हजरत मौलाना शाह फजलूर्रहीम साहाब मुजद्दीद यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या जननिषेध सभेसाठी जिल्हाभरातील मुस्लीम समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन बीड येथील वक्फ बचाव कमिटी, मजलिस ए उलेमा यांनी केले आहे.













बीड शहरातील मोमीनपुरा बायपास रोडवरील मैदानावर उद्या दि.२९ जुन रविवार रोजी दुपारी १ ते ५ यावेळेत ऑल इंडिया पर्सनल लॉ बोर्डाच्या वतीने वक्फ बिलाच्या विरूध्द जननिषेध सभा आयोजीत

▶▶ पान २ वर




जिल्हाभरातील समाज बांधवांनी उपस्थित रहावे- वक्फ बचाव कमेटी, मजलीस उलेमा यांचे आवाहन

## ज्ञानदानच्या पवित्र स्थळी निच कृती करणारे ते दोन्ही नराधम फरारच

# या मध्ये कोणीही राजकारण करू नये

# या भामट्यांचे सर्वच नेत्यांसोबत घनिष्ट संबंध

Email.- dailydivyawarta@Gmail.com

Email.-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

पोलिसांनी स्पॉट पंचनामा केला, सीसीटिव्ही तपासले, कोचिंग सेंटर सील केले

## जाणून बुजून कोणी एकाला टार्गेट करणे चुकीचे





### विजय पवार संदीप क्षीरसागरांचा राईट हॅन्ड-योगेश क्षीरसागर

बीड (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यात खाजगी कोचिंग क्लासमध्ये नीटची तयारी करणाऱ्या एका १७ वर्षीय मुलीच्या लैंगिक छळ आणि छेडछाड प्रकरणाने पुन्हा एकदा मोठी खळबळ उडाली आहे. विजय पवार आणि प्रशांत खाटोकर असे या दोन शिक्षकांचे नाव असून या दोन्ही शिक्षकांविरोधात फॉक्स अंतर्गत बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाय. बीडमधील अल्पवयीन मुलीच्या लैंगिक छळाचे पडसाद आता संपूर्ण जिल्हाभर उमटत आहेत. या पार्श्वभूमीवर पक्ष संघटनांनी शैक्षणिक बंद पुकारला आहे. अल्पवयीन मुलीच्या छळ प्रकरणातील आरोपी शिक्षक विजय पवार याला राजकीय पाठबळ असून आमदार संदीप क्षीरसागर यांचा तो राईट हॅन्ड असल्याचा आरोप संदीप क्षीरसागर यांचे भाऊ व अजित पवार गटाचे नेते योगेश क्षीरसागर यांनी केलाय.घटनेच्या निषेधार्थ बीडमधील कोचिंग क्लासेस बंद ठेवण्यात



▶▶ पान २ वर

## सोमवारी जिल्हा बंदची हाक





### इतर मुलींसोबत घडले असेल तर तक्रार नोंदवावी-संध्या राजपुत

बीड (दिव्य न्युज):- शहरातील मध्यवर्ती भागामध्ये उमाकिरण नावाचे मोठे शैक्षणिक संकुल असून या ठिकाणी अनेक कोचिंग क्लासेस असल्यामुळे शाळकरी व महाविद्यालयीन तरुण-तरुणी शिक्षणासाठी या ठिकाणी येतात पाल्यांच्या उज्वल भविष्यासाठी पालक



▶▶ पान २ वर

## आता या भामट्यांवर आयुष्यात कोणी विश्वास ठेवणार नाही

## वक्फ बोर्ड कडून आता आमखासवर फुटबॉल सोबत इनडोअर

# बीडकरांचे स्टेडियमचे स्वप्न साकार होणार

### केंद्र व राज्य शासन कडून ४०० कोटींची भरघोस मदत मिळणार,४३ वक्फ संस्था ताब्यात घेणार

औरंगाबाद (दिव्य न्युज):- महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या वतीने मराठवाड्यातील दोन शहरात स्टेडियम होणार आहे.छत्रपती संभाजी नगरच्या आमखास मैदान सोबतच बीडला ही स्टेडियम होणार असल्याची महत्वपूर्ण माहिती एका पत्रकार परिषदेत वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर गुलाम नबी काझी यांनी दिली.केंद्र व राज्य शासनाच्या अल्पसंख्यांक मंत्रालयात कडून चारशे कोटींचा संयुक्त निधी उपलब्ध करून देण्यात येणारआहे.आमखास मैदानावर फुटबॉल स्टेडियम बरोबर इनडोअर स्टेडियम ही होणार आहे,राज्यातील १४३ संस्था ताब्यात घेण्यात येणार आहे तर भाडेकरूंना भाडेकरार न केल्यास कारवाईला सामोरे जावे लागेल,अशी महत्वाची माहिती ही त्यांनी या वेळी दिली

४०० कोटींचा निधी,बीडकारांचे स्वप्न साकार

▶▶ पान २ वर




## शेतीच्या वादातून सेवानिवृत्त

# पीएसआयला मारहाण

### उपळी फाटा येथील घटना; वडवणी पोलिसात चार पुरुष, दोन महिलावर गुन्हा दाखल

वडवणी (दिव्य न्युज):- शेतीच्या वादातून झालेल्या मारहाणीत माजलगावच्या रहिवासी असणार्या ६१ वर्षीय सेवानिवृत्त पीएसआयला मारहाण करण्यात आली आहे. ही घटना दि. २१ जून रोजी दुपारी १२ वाजता उपळी फाटा येथील शेतात घडली असून रात्री उशिरा वडवणी पोलिसात चार पुरुषासह दोन महिला आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला असून अद्याप आरोपीला अटक करण्यात आलेली नाही.

माजलगाव येथील शिक्षक कॉलनी रहिवासी असणारे अर्जुन मनोहरराव पवार वय ६१ वर्ष सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक असं मारहाण झालेल्या सेवानिवृत्त पीएसआय यांचे नाव आहे. दिनांक २१ जून रोजी दुपारी १२ वाजता उपळी फाटा येथील गट नं.१९ या शेतामध्ये सेवानिवृत्त पीएसआय गेले असता तेथील शेती वरून वाद झाला. या वादामध्ये त्यांना लोखंडी रॉडने डाव्या पायाच्या घोट्याच्या वर मारून पाय फ्रॅक्चर केला. तसेच नडगीवर व उजव्या पायाच्या मांडीवर,

▶▶ पान २ वर

# अहमदनगरचे जेष्ठ पत्रकार सय्यद वाहाबसह मान्यवरांचा
# दिव्य वार्ता कार्यालयात यथोचित सत्कार





बीड : अहमदनगर येथील जेष्ठ पत्रकार सय्यद वाहाब आणि ॲड.हनीफ बाबू हे बीड येथे आले असता त्यांनी कश्मकश, दिव्य वार्ता कार्यालया भेट दिली. यावेळी कार्यालयात त्यांचा हार,शाल, पुष्पगुच्छ देवून आदर सत्कार करण्यात आला. यावेळी जेष्ठ पत्रकार सय्यद वाहाब, विधीतज्ञ ॲड.हनिफ बाबू, सय्यद नवीद हैदर, सय्यद वसीम, शेख अल्ताफ यांचा सत्कार संपादक मोहंमद अबूबकर, कार्यकारी संपादक काशेफ चाऊस, आकाश नाईक, शेख इर्शाद सह आदींची उपस्थिती होती.






### वडवणी तालुक्यातील गुटखा तस्करांचे धाबे दणाणले

# वडवणी पोलिसांनी चार लाखांचा गुटखा केला जप्त

वडवणी, (दिव्य न्युज):- वडवणी पोलिसांनी कारवाई करत तब्बल चार लाख रुपयांचा गुटखा जप्त केला आहे. पोलिसांच्या कारवाईमुळे गुटखा तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

तालुक्यातील कुंदेवाडी येथे एक इसम गुटख्याचा माल बाळगून विक्री करतो अशी गोपनीय माहिती वडवणी पोलिसांना मिळाली होती. त्यावरून सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांनी आपल्या स्टाफ सह सदर ठिकाणी छापा मारला. त्यावेळी त्या ठिकाणी संतोष कठाळे, वय वर्ष ३२ रा. कुंदेवाडी यांच्या घरात तंबाखू, हिरा, राज निवास, बाबा, आर एम डी अशा विविध प्रकारच्या सुगंधी तंबाखू याचा जवळपास तीन लाख ७२ हजार २०० रुपयाचा माल मिळून आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कामत यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांनी आपल्या पथकातील पोलीस अमलदार विलास खरात, बिबीशन गुंजाळ, नवनाथ, किरण तिरमले, वसंत करे यांनी केले आहे. आरोपी विरुद्ध वडवणी पोलीस स्टेशनमध्ये कलम डीएनएस १२३, २२३, २७४,२७५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पान ४ वरून

## जिंतूर ते पाचलेगावं

त्यात बलासा शिवारात त्याचे प्रमाण अधिक आहे. त्यासाठी काही शेतकऱ्यांनी तोंडी व लेखी पत्र दिले आहे परंतु कार्यवाही झाली नाही. सांग शेतकऱ्यांनी उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम यांचेशी संपर्क साधला असता त्यांनी सदरील रोडचे मेन्टन्स दहा वर्षापर्यंत रोड चे काम करणाऱ्या गुत्तेदाराकडे असल्याचे सांगितले. संबंधित गुत्तेदारांना कळवून नालीची साफसफाई करून दिली जाईल असे सांगितले आहे. निवेदनाच्या प्रति ना. तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघनादीदी साकोरे बोर्डीकर, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम परभणी आणि भाजप जिल्हा ग्रामीण अध्यक्ष सुरेश भुमरे यांना पाठवण्यात आल्या आहेत.

## पत्नी नोकरीला, बंगला,

योजनेचे रेशन कार्ड प्राप्त केलेले आहे. त्यामध्ये कुटुंबातील सर्व सदस्यांचे आधार कार्ड लिंक केलेले आहेत. भालशंकर कुटुंबाकडे असणाऱ्या शिधापत्रिकेची तपासणी करुन आर्थिकदृष्ट्या सक्षम असतांना त्यांनी अंत्योदय अन्न योजनेचे रेशन कार्ड काढून एप्रिल २०२३ पुर्वी या योजने अंतर्गत धान्य ऑनलाईन रिपोर्ट नुसार उचलल्याचे अभिलेखाची ऑनलाईन पाहणी केली असता दिसून येते. त्यांनी बनावट रेशन कार्ड काढण्यासाठी खोटी कागदपत्रे तयार करुन पुरवठा विभागाची फसवणूक केली. दि.१९ मार्च २०१८ ते १८ एप्रिल २०२३ पर्यंत भालशंकर दाम्पत्याने ऑनलाईन अंत्योदय योजनेचे बनावट पिवळे रेशन कार्ड काढले. तसेच संगनमत करुन खोटे कागदपत्र दाखल करुन बीड तहसिल कार्यालयाची तसेच शासनाची फसवणूक केली, असे नायब तहसिलदार सुपेकर यांनी फिर्यादीत म्हटले आहे. त्यानुसार भालशंकर दाम्पत्याविरुद्ध कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे शिवाजी नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

## खा.बजरंग बप्पा यांना

दृष्टीकोन जातीय व धार्मिक पूर्वग्रहदूषित असल्याचा आरोप पक्का होताना दिसतो. खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्याकडून मुस्लिम समाजाकडे सातत्याने दुर्लक्ष केलं जातंय, असा आरोप एमआयएम अध्यक्ष अन्वर हाशमी यांनी स्पष्टपणे केला. २०२४ मध्ये मते भर भरून, दिली आता दुर्लक्ष का?

२०२४ लोकसभा निवडणुकीत नेकनूरमधील मुस्लिम समाजाने भरभरून मतदान केले. मात्र, त्यानंतर विकास योजनांच्या यादीत मुस्लिम बहुल भागांचा पूर्णपणे गैरसमावेश झाल्याचं चित्र आहे. यामुळे मुस्लिम समाजात अस्वस्थता असून, हा फसवणुकीचा व पाठीत खंजीर खुपसण्याचा प्रकार असल्याचं मत स्थानिक पत्रकार शेख शाकेर यांनी मांडलं.

दर्गा केवळ धार्मिक नाही, तर ऐतिहासिक वारसा:

हजरत सय्यद इब्राहिम शाह शहीद रहमतुल्ला अलैह दर्गा हे स्थान केवळ मुस्लिम धर्मीयांसाठी नव्हे, तर सर्व धर्मीयांच्या श्रद्धेचं केंद्र आहे. दरवर्षी येथे विविध जाती-धर्मातील भाविक भेट देतात. असे असताना, या महत्त्वाच्या धार्मिक व सांस्कृतिक स्थळाकडे दुर्लक्ष का करण्यात आलं? याचे उत्तर सत्ताधाऱ्यांनी जनतेसमोर द्यावे, अशी मागणी जोर धरते आहे.

राजकीय पडसाद होण्याची शक्यता:

जर निधी वाटपात हा पक्षपात सुरूच राहिला, तर त्याचे परिणाम आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत स्पष्टपणे जाणवतील, असं देखील मुस्लिम समाजातील ज्येष्ठांनी इशारा दिला आहे.

पान १ वरून

## विजय पवार संदीप

आले असून कोचिंग क्लासेस परिसरात पोलिसांचा अतिरिक्त बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. मुलीच्या फिर्यादीवरून दोन्ही शिक्षकांवर पोस्को अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत असून दोन्ही शिक्षक अद्याप फरार आहे. पोलिसांनी आरोपी शिक्षकांच्या अटकेसाठी विशेष पथक रवाना केले आहे.

विजय पवारला राजकीय पाठबळ

मागील दोन वर्षात बीड वेगळा वळणावर असताना ही घटना शिक्षणक्षेत्राला काळीमा फासणारी आहे. ही घटना झाल्यानंतर यातील शिक्षक रात्री लोकप्रतिनिधींच्या घरी होता आणि त्या ठिकाणाहून यंत्रणेला फोन देखील केला. यातील फराळ आरोपी अजून का पकडले गेले नाही त्याचा तपास कोणा गरजेच कोणा कोणाचा दबाव आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला? ज्या लोकांसोबत हे शिक्षक राहतात त्यांच्याकडून कितपत पाठिंबा त्यांना दिला गेला आहे हे शोधून काढणे गरजेचे आहे.

विजय पवार हा शिक्षण क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून आहे. लहान मोठ्या क्लासेस इथे येऊ नयेत यासाठी मोठा दबाव तंत्र त्यांना वापरलं. अनेक जमीन घोटाळ्यात शिक्षण पवार सामील असून कोट्यवधी रुपयांची माया त्याने जमा केली आहे. त्यातून येथील राजकारण सुरू असल्याचं योगेश क्षीरसागर यांनी म्हटलं. आरोपी विजय पवार विद्यमान आमदारांचे राईट हॅन्ड असल्यासारखे आहेत. घटनेनंतर ते आमदारांच्या घरी गेलेत रात्री. याचा तपास व्हायला पाहिजे. यांचे कुठे कुठे फोन कॉल गेलेत? कुठून दबाव आणण्याचा प्रयत्न केला गेला? इतक्या गंभीर गुन्ह्यामध्ये आरोपी फरार राहतोच कसा? याचा तपास घेतला पाहिजे. असेही ते म्हणाले.

महिला आयोगानेही घेतली दखल

अल्पवयीन मुलीच्या विनयभंगाची प्रसार माध्यमांवर झळकलेली बातमी पाहून राज्य महिला आयोगाने तात्काळ दखल घेतली. उमा किरण क्लासेस मधील दोन प्राध्यापकांवर गंभीर आरोप असून हे प्रकरण अत्यंत गंभीर स्वरूपाचा असल्याचा आयोगाने नमूद केला आहे. आरोप निश्चित होईपर्यंत क्लासेसची इमारत सील ठेवावी. सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घ्यावं व फरार आरोपींचा शोध घ्यावा असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. इतर विद्यार्थ्यांच्या तक्रारींची ही नोंद घ्यावी अशा सूचना महिला आयोगाने केल्या आहेत. याप्रकरणी चौकशी करून कार्यवाहीचा अहवाल तात्काळ ईमेलद्वारे सादर करण्याचा आदेशही प्रशासनाला देण्यात आले आहेत.

## इतर मुलींसोबत

मोठी रक्कम फीस च्या माध्यमातून या ठिकाणी भरून आपले पाल्य जीवनामध्ये चांगले यशस्वी जीवन जगावे व चांगल्या क्षेत्रामध्ये नाव कमवावे यासाठी सदरील शैक्षणिक संकुलामध्ये व तेथे शिक्षण देणाऱ्या शिक्षक व प्राध्यापक यांच्या भरोशावर पाठवत आहेत परंतु पालकांच्या या विश्वासाला मोठा तडा गेलेला असून उमाकिरण शैक्षणिक संकुलामध्ये पवार व खाटोकर नामक नराधमाने या ठिकाणी शिक्षणासाठी मुलीं चा विनयभंग केल्याचा प्रकार उघडकीस आलेला आहे यासंबंधी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झालेला असून आरोपी फरार असल्याचे दिसत आहे . अश्या नराधमास तात्काळ अटक करावी व सदरील शैक्षणिक संकुलामध्ये यापूर्वीही अनेक शालेय व महाविद्यालयीन तरुणीवर असा प्रसंग झाला असल्याचे चर्चा या ठिकाणी होत असल्यामुळे पीडित असलेल्या तरुणींनी समोर येऊन त्यांच्या विरोधात तक्रार नोंदवावी असे आवाहन भारतीय जनता पार्टीच्या महिला प्रदेश सचिव ड.संध्या ताई राजपूत यांनी केले आहे.

## वक्फ बिलाविरूध्द

करण्यात आली आहे. सभेची तयारी पुर्ण झाली असून या जननिषेध सभेच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या मुस्लीम वक्फ दुरूस्ती विधेयकाविरूध्द जनतेचा आवाज बुलंद करण्यात येणार आहे. मुस्लीम वक्फ दुरूस्ती विधेयक मुस्लीम समुदायाच्या हिताच्या वरोधात आहे. विधेयकात मुस्लीम वक्फच्या वर्तमान व्यवस्थेत अनावश्यक बदल करण्यात आला असून लोकशाही तत्वांचे उल्लंघन करण्यात आले आहे. संसदेत विरोधी पक्षाचा स्पष्ट विरोध आणि तार्कीक युक्त्यांना दुर्लक्ष करून विधेयक जबरदस्तीने मंजुर करण्यात आले असून हे विधेयक मुस्लीम पर्सनल लॉ आणि वक्फ व्यवस्थापनात सरकारच्या हस्थक्षेपाला चालना देणारे आणि घटनात्मक तत्वांविरूध्द असल्याचे वक्फ बचाव कमिटीने म्हटले आहे. त्याच अनुषंगाने ऑल इंडिया पर्सनल लॉ बोर्ड या दुरूस्ती कायद्याविरूध्द लढा देत असून शांततेत आणि लोकशाही मार्गानेच केंद्र सरकारकडे नाराजी व्यक्त केली जात आहे. त्यानुसार उद्या दि.२९ जुन रोजी ही जननिषेध सभा आयोजीत करण्यात आल्याची माहिती बीड येथील मुफ्ती आरीफ साहाब, मुफ्ती अब्दुलाह साहाब, मुफ्ती जावेद साहाब, हाफीज जाकेर साहाब, मौलाना अब्दुल रहीम साहाब, मुफ्ती अखील साहाब, मुफ्ती अब्दुल रौफ साहाब, हाफीज नजीर साहाब, मुफ्ती अन्वर साहाब, मौलाना सफदर साहाब, मौलाना अखील साहाब, मौलाना शकील साहाब, मौलाना अब्दुल सत्तार साहाब आदिंनी पत्रकार परिषदेत दिली.

## बीडकरांचे स्टेडियमचे

होणार राज्य वक्फ बोर्डा कडून शहराच्या आमखास मैदानावर दर्जेदार स्टेडियम व्हावे या साठी राज्य शासनाला कडे १०९ कोटींचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता.बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी व मुख्यकार्यकारी अधिकारी जुनेद सय्यद यांनी या साठी विशेष पाठपुरावा केला.आता समीर काझी यांनी पुन्हा वाढीव निधी साठी केंद्रीय अल्पसंख्यांकमंत्री किरण रिजिजू व राज्य अल्पसंख्यांक मंत्री दत्तात्रय भरणे यांच्याशी प्राथमिक चर्चा केली.यावर दोघांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.अध्यक्ष समीर काझी यांनी राज्यात वक्फ बोर्ड अंतर्गत बीड शहरात ही एक दर्जेदार स्टेडियम व्हावे म्हणून मागणी केली असता चर्चेत निधी साठी नियोजन करण्याचे आश्वासन देण्यात आले.समीर काझी यांच्या सक्षम नेतृत्वाखाली बीडकरांचे,क्रीडा खेळाडूंचे स्वप्न साकार होणार आहे.बीड येथे आधुनिक,दर्जेदार स्टेडियम झाल्या नंतर खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्याची संधी उपलब्ध होऊ शकते.मी आपल्या कर्मभूमीत मोठं काम केल्याचा मला अभिमान असणार आहे,अशी प्रतिक्रिया ही या वेळी अध्यक्ष काझी यांनी व्यक्त केली.

आमखास मैदानावर फुटबॉल स्टेडियम सोबत इतर खेळा साठी इनडोअर स्टेडियम व्हावा,म्हणून केंद्र व राज्य सरकार निधी उपलब्ध करून देणार असल्याचे अध्यक्ष काझी यांनी सांगितले.बोर्डाच्या बैठकीत अधिकृतरित्या मंजुरी देण्यात आली.आता बोर्डा कडून लवकरच मान्यस्तव प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे.

- १४३ संस्थांना ताब्यात घेऊन विकास करणार

- राज्यातील तब्बल १४३ वक्फ संस्थांना घेत बोर्डा कडून ताब्यात घेऊन त्यांचा विकास करण्याचा प्रस्ताव ही बैठकीत करण्यात आला.या संस्थेत वादविवाद व तक्रारी असल्याने त्यांच्या कडून वक्फ फंड वसूल करण्यात अडचण होत होती.तसेच विकास न झाल्याने त्याचा सर्वसामान्यांना फायदा होत नव्हता.आता बोर्ड संस्थांना थेट ताब्यात घेऊन देखरेख करणार आहे.शक्य तो विकास करून वाढीव वक्फ फंड वसूल होईल अशी अपेक्षाही अध्यक्ष काझी यांनी व्यक्त केली.

भाडेकरार न करणाऱ्यांना आता कायदेशीर धडा कारवाई

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळा अंतर्गत तब्बल एक लाख एकदा पैकी ओसाहत टक्के जमिनीवर अतिक्रमण आहे.ज्या संस्थांच्या अंतर्गत जमिनि, व्यवसायिक प्रतिष्ठाने ते केंद्रीय कायदा २०१४ नियमा प्रमाणे भाडेकरार करत नाहीं. बोर्ड अश्या कब्जा करणाऱ्या जमीन व प्रतिष्ठानने यांच्या भोगवटादारांना नोटिसा पाठवणार आहे.भाडेकरार न करणाऱ्या विरोधात कलम ५२ व ५४ ची कारवाई राबविण्यात येणार आहे.

मॉडेल स्कीम योजना राबविणार

राज्यातील संस्थांच्या अनेक स्कीम व फेरबदल सध्या प्रलंबित आहेत.या प्रकरणाचा लवकर निपटारा व्हावा म्हणून जिल्ह्याच्या ठिकाणीच वक्फ अधिकाऱ्यांनी पडताळणी करून प्रस्ताव मुख्यालयात पाठविण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.येत्या दोन महिन्या सर्व योजना प्रकरणांचा निपटारा करण्याचे निर्देश देण्यात आले आहे.गतिमान प्रशासन व्हावे यासाठी निर्णय घेण्यात आल्याचे माहिती अध्यक्ष काझी यांनी दिली.

येत्या वर्षी वीस कोटींचे लक्ष्य

२०२४-२५ साली वक्फ बोर्डाचा निधी दहा कोटींचा जमा झाला आहे.पूर्वी तो फक्त सहा कोटी होता.आता अंतर्गत लेख परीक्षण विभागाला २०२५-२६ साली वीस कोटींचा निधी जमा करण्याचे लक्ष्य देण्यात आले आहे.निधीत वाढ झाल्याने बोर्डा कडून राज्यातील गोरगरिबांना शैक्षणिक स्कॉलरशिप,आरोग्य व इतर जनहितार्थ कामे कामे।करण्यात येणार आहे.

रोजंदारी कर्मचाऱ्यांना २०० रुपय वाढीव पगार,दर महिन्याला बैठक तसेच दर महिन्याच्या शेवटच्या

गुरुवारी सुनावणी व शुक्रवारी बैठकीचे आयोजन करण्यात येणार आहे.बैठकी साठी आता अध्यक्ष व सदस्यांची मंजुरीची गरज राहणार नाही.गरजू लोकांना सोयीस्कर व्हावे या संताजी बैठकीत हा महत्वाचा निर्णय घेण्यात आला.,असल्याची माहिती अध्यक्ष काझी यांनी दिली.

बैठकीत वरिष्ठ सदस्य मौलाना अथर अली,ॲड.ए.यु.पठाण,ॲड.इफतेखार हाश्मी,मुख्यकार्यकारी अधिकारी जुनेद सय्यद,उपमुख्यकार्यकरी अधिकारी मुशीर शेख,विशेष अधीक्षक खुसरो खान यांची उपस्थिती होती.

## शेतीच्या वादातून

नडगीवर, पोटावर मुक्कामार देऊन जखमी केले आहे. ही मारहाण बाबी तांडा नं.२ येथील रहिवासी असणारे रामेश्वर भानुदास राठोड, राजेश चंदू राठोड, अनिल ज्ञानोबा राठोड, चंदू हिरामण राठोड व नाव माहित नसलेल्या दोन महिला यांनी मारहाण केली आहे. या आरोपी विरोधात सेवानिवृत्त पीएसआय अर्जुन पवार यांच्या फिर्यादीवरून वरील आरोपी विरोधात वडवणी पोलिसात रात्री उशिरा गुरनं १६९/२०२५ कलम ११८(२), १८९(२), १९१(२), १९१(३), १९०, ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३), बी एन एस प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अद्याप पर्यंत आरोपींना अटक करण्यात आली नाही अशी माहिती वडवणी पोलीस स्टेशनच्या ठाणेप्रमुख वर्षा व्हगाडे मॅडम यांनी दिली आहे.